# -: सुधारित प्रसिध्दीपत्रक :-

**संदर्भ :- सुरक्षा रक्षक भरती जाहिरात २०२० दि. २५.०२.२०२०.**

महामंडळाने संदर्भ क्र. ०१ अन्वये ७००० सुरक्षा रक्षक भरती प्रक्रियेसाठी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानुसार मार्च - एप्रिल २०२० या दरम्यान मुंबई व नागपूर अशा दोन ठिकाणी भरती प्रक्रिया राबविण्याचे नियोजन करण्यात आले होते. सदरची भरती प्रक्रिया दि. २०.०८.२०२२ पासून खालील नमूद राज्य राखीव पोलीस बल गट या ठिकाणी सुरू करण्यात येत आहे.

| अ. क्र. | राज्य राखीव पोलीस बल गटाचे नाव | उमेदवारांची संख्या | उमेदवारांचे पत्यानुसार जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०१, पुणे | १३०५९ | पुणे जिल्हा / अपूर्ण पत्ता असलेले उमेदवार |
| २ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०५, दौंड | १७१२६ | सातारा, सोलापूर, नाशिक |
| ३ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०७, दौंड | १५४६३ | सांगली, कोल्हापूर, अहमदनगर |
| ४ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०६, धुळे | १८८११ | धुळे, जळगाव, नंदूरबार |
| ५ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०३, जालना | १७९०५ | जालना, हिंगोली, बीड, उस्मानाबाद, परभणी |
| ६ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. १४, औरंगाबाद | १९३२२ | औरंगाबाद, लातूर, बुलढाणा, नांदेड, |
| ७ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ११, बाळेगाव, नवी मुंबई | ७००५ | मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग |
| ८ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०४, नागपूर | ११६७२ | नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली |
| ९ | राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ०९, अमरावती | १३३३० | अमरावती, यवतमाळ, अकोला, वर्धा, वाशिम |

१. सदर भरती प्रक्रिया ही मुळ जाहिरातीमधील अटी व शर्तीनुसार त्याचप्रमाणे वयाचा निकष यासाठी जाहिरातीमध्ये नमुद करण्यात आलेली दिनांक आधारभूत धरली जाणार आहे. प्रत्येक दिवशी प्रत्येक केंद्रावर १५०० उमेदवार बोलाविण्यात येणार आहेत.

२. जाहिरातीमधील नमुद किमान निकष पूर्ण करणारे व भरती शुल्क महामंडळाकडे जमा केलेले उमेदवार यांना सदर भरतीप्रक्रियेसाठी बोलाविण्यात येणार आहे.

३. उमेदवारांची जिल्हानिहाय यादी यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. यादीत दर्शविलेल्या दिनांकास त्यांनी भरतीसाठी शैक्षणिक अर्हता व इतर कागदपत्रांसह हजर राहावे, असे याव्दारे कळविण्यात येत आहे.

४. उमदेवारांना ठरवून दिलेल्या दिनांकास भरतीसाठी हजर होणे काही अपरिहार्य कारणास्तव शक्य न झाल्यास, त्यांना त्यानंतर पुढील ०३ दिवसात संबधीत भरती केंद्रावर हजर राहता येईल.

५. प्रत्येक उमेदवारांनी भरतीवेळी येताना ऑनलाईन अर्जाची छायांकित प्रत, अर्ज शुल्क भरणा केलेली पावती, ०२ फोटो, शैक्षणिक मुळ कागदपत्रे व त्यांची झेरॉक्स प्रत सोबत आणावी.

६. दि. १८.०८.२०२१ रोजी महामंडळाने प्रस्तुत भरती रद्द करण्याबाबत जारी केलेले प्रसिध्दीपत्रक याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

**(अश्विनी सानप)**
**पोलीस अधिक्षक तथा महाव्यवस्थापक**
**(प्रशासन / वित्त / भरती व प्रशिक्षण)**
**अतिरिक्त कार्यभार उप व्यवस्थापकीय संचालक**
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई